निवडसूची-२०१५-२०१६

गट-'क'पदसमूह-२ मधून उप अधिक्षक भूमि अभिलेख,गट- 'ब' संवर्गात तात्पूरती पदोन्नती ने नियुक्ती देण्याबाबत......

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग,

शासन आदेश क्रमांक : आस्था-२०१६/प्र.क्र.१२६(भाग-२)/ई-६

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,

दिनांक : २१ मे,२०१८

वाचा : १) जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख (म.रा.) पुणे यांचे पत्र क्र. आस्था/ प्र.क्र.७७/२०१८/आ-१, दिनांक १२.०२.२०१८

२) जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख (म.रा.) पुणे यांचे पत्र क्र. आस्था/ प्र.क्र.२२२/२०१८/आस्था-१, दिनांक ०३.०५.२०१८

प्रस्तावना:-

भूमी अभिलेख विभागातील गट-क पदसमूह-२ संवर्गामधून उप अधीक्षक भूमी अभिलेख गट-ब संवर्गामध्ये पदोन्नती देण्याबाबत निवडसूची-२०१३-२०१४ साठी आयोजित विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीच्या वेळी श्री. संजीव नानाजी जगताप, मुख्यालय सहाय्यक, उप अधीक्षक भूमि अभिलेख, पेठ हे शिक्षा अंमलाखाली (दिनांक ३०.०६.२०१५ पर्यंत) असल्याने त्यांच्या नावाचा सन २०१३-२०१४ च्या निवडसूचीमध्ये समावेश करता येणार नाही, असे अभिप्राय सामान्य प्रशासन विभागाने दिले होते. त्यानुषंगाने पुढील निवडसूची मध्ये म्हणजेच सन २०१५-२०१६ च्या निवडसूचीमध्ये श्री. संजीव नानाजी जगताप यांच्या नावाचा समावेश करण्यासाठी विभागीय पदोन्नती समितीने शिफारस केली आहे. त्यानुषंगाने श्री. संजीव नानाजी जगताप यांना उप अधीक्षक भूमि अभिलेख, गट-ब या संवर्गामध्ये पदोन्नतीने पदस्थापना देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन आदेश :-

भूमि अभिलेख विभागातील गट-'क' पदसमूह-२ या संवर्गात कार्यरत असलेले श्री. संजीव नानाजी जगताप, मुख्यालय सहाय्यक, उप अधीक्षक भूमि अभिलेख, पेठ, जि. नाशिक यांना उप अधिक्षक भूमि अभिलेख गट-'ब' (वेतनश्रेणी ९३००-३४८०० ग्रेड पे ४४००) या संवर्गात स्तंभ क्र. ३ मध्ये दर्शविलेल्या पदावर तात्पुरत्या स्वरूपात पदोन्नतीने पदस्थापना देण्यात येत आहे.

अ.क्र.	अधिकाऱ्याचे नाव व पदनाम	पदोन्नतीने पदस्थापना केलेले पद	शेरा
१	२	३	४
१	श्री. संजीव नानाजी जगताप, मुख्यालय सहाय्यक, उप अधीक्षक भूमि अभिलेख, पेठ, जि. नाशिक	उप अधीक्षक भूमी अभिलेख, सिरोंचा, जि. गडचिरोली	रिक्त पदावर

२. वर नमूद अधिकाऱ्यांस खालील अटींच्या अधीन राहून पदोन्नती देण्यात येत आहे :-

अ) पदोन्नतीचे पद महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील असल्याने या पदावर देण्यात आलेली पदोन्नती (निवडसूची) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेने नियमीत

केल्या नंतरच सदर पदावर सेवा ज्येष्ठता व अन्य सेवाविषयक लाभ मिळण्यास पदोन्नत अधिकारी पात्र ठरतील.

ब) सदर पदोन्नती ही वयाच्या ५०/५५ वर्षापलीकडे सेवेत ठेवण्याबाबतच्या तत्संबंधीच्या आदेशाच्या अधीन राहील.

क) त्यांना देण्यात आलेली ही पदोन्नती कोणतीही पूर्वसूचना वा नोटीस न देता रद्द करण्याचा अधिकार शासन राखून ठेवीत आहे.

३. सदर पदोन्नती ही " महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदावर सरळ सेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसूली विभाग वाटप नियम-२०१५" दिनांक २८.४.२०१५, दिनांक १६.०७.२०१५ व दिनांक १५.०६.२०१७ च्या सुधारणेनुसार महसूली विभाग वाटप करण्यात आलेला आहे.

४. पदोन्नती झालेल्या अधिकाऱ्यांनी उप अधीक्षक भूमी अभिलेख या पदाचा कार्यभार ग्रहण केल्यावर त्या अधिकाऱ्यांची प्रचलित नियमानुसार वेतननिश्चिती करावी.

५. संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी वरील पदोन्नत अधिकाऱ्यास पदोन्नतीच्या पदावर रुजू होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करावे. संबंधीत अधिकाऱ्यास नवीन नियुक्तीच्या जागी हजर होण्यासाठी मूळ कार्यालयाने कोणत्या दिनांकास कार्यमुक्त केले आणि ते नविन नियुक्तीच्या जागी कोणत्या दिनांकास हजर झाले, याबाबत जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख, पुणे यांनी शासनास त्वरित अवगत करावे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०१८०५२११५५३१६९११९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

Santosh
Haridasrao Bhogle

Digitally signed by Santosh Haridasrao Bhogle
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=cfe36679ae12922422bc5e7f7d277841f1fe67725f465c272fd6727259260b3d, cn=Santosh Haridasrao Bhogle
Date: 2018.05.21 15:54:11 +05'30'

(डॉ.संतोष भोगले)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति:

जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे,

प्रत :
१) उपसंचालक भूमि अभिलेख, नाशिक प्रदेश, नाशिक (द्वारा जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख,पुणे)
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा), महाराष्ट्र -१,मुंबई
३) संबंधीत कर्मचारी (द्वारा जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, म.रा.पुणे)
४) खाजगी सचिव, मा. मंत्री (महसूल) , मंत्रालय, मुंबई - ३२.
५) खाजगी सचिव, मा.राज्यमंत्री (महसूल), मंत्रालय, मुंबई - ३२.
६) कार्यासन अधिकारी, कार्यासन-१२, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
७) निवडनस्ती ई-६ कार्यासन, महसूल व वन विभाग.